# जिल्हा परिषद गट–क सरळसेवा पदभरती 2023 - सुचना

1. नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, ठाणे, पालघर, गडचिरोली, चंद्रपुर, अमरावती, यवतमाळ , नांदेड या जिल्हापरिषद मधील बिगर पेसा क्षेत्रातील आरोग्य सेवक (पुरुष) 40%, आरोग्य सेवक (पुरुष) 50% (हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी), आरोग्य परिचारिका (आरोग्य सेवक (महिला), अंगणवाडी पर्यवेक्षिका तसेच रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हा परिषद मधील आरोग्य सेवक (पुरुष) 40%, आरोग्य सेवक (पुरुष) 50% (हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी) या **पदांचा निकाल दि. 31 ऑगस्ट 2024 पर्यंत घोषित करण्यात येईल .**

2. दि.29 व 30 जुलै, 2024 रोजी कंत्राटी ग्रामसेवक या पदासाठी 13 जिल्हा परिषदांच्या परिक्षा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये **कोल्हापूर जिल्हयामध्ये** पुणे, अमरावती, यवतमाळ, नांदेड, चंद्रपुर, गडचिरोली, नाशिक, अहमदनगर, धुळे, जळगाव व नंदुरबार या जिल्हा परिषदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची परिक्षेची व्यवस्था केली होती. तथापि कोल्हापूर जिल्हयातील पुर परिस्थितीमुळे परिक्षा देवू न शकलेल्या गैरहजर असलेल्या उमेदवारांची परिक्षा दि.28 ऑगस्ट 2024 रोजी घेण्यात येऊन कंत्राटी ग्रामसेवक पदांचा निकाल दि. 15 सप्टेंबर 2024 पूर्वी घोषित करण्यात येईल.